**विशेष दिवाणी दावा क्रमांक ०८/२०२१ मधील नि.क्र.३० वरील आदेश**

**CNR No.MHSN02-003436-2020**

१. प्रतिवादी यांनी, त्यांच्या विरुध्द कैफियत देणेसाठी झालेला उशिर माफ होवून मिळणेसाठी, तसेच त्यांच्याविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करणेसाठी व त्यांची कैफियत रेकॉर्डवर घेणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी मुळ दावा स्पेसिफिक परफॉर्मन्ससाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी यांना नोटीस रुजू झाल्यानंतर प्रतिवादी या आजारी असल्याने व वयोमानामुळे वेळेत व मुदतीत वकीलांची भेट घेवू शकल्या नाहीत. त्यामुळे त्यांना कैफियत दाखल करणेस विलंब झालेला आहे. प्रतिवादी यांनी जाणूनबूजून विलंब अथवा टाळाटाळ केलेली नाही. सबब विलंबामुळे त्यांच्या विरुध्द जो 'विना कैफियत' असा आदेश झालेला आहे तो आदेश रद्द करुन त्यांची कैफियत रेकॉर्डवर घेणेकरीता प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. सदर अर्जास अनुषंगिक वादी यांनी त्यांचे म्हणणे त्याच अर्जावर दाखल केलेले आहे. त्यांनी अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे,

४. प्रतिवादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये प्रतिवादी यांना नोटीस रुजू झाल्यानंतर प्रतिवादी या आजारी असल्याने व वयोमानामुळे वेळेत व मुदतीत वकीलांची भेट घेवू शकल्या नाहीत. त्यामुळे त्यांना कैफियत दाखल करणेस विलंब झालेला आहे असे शपथपूर्वक कथन केलेले आहे. अशा परिस्थीतीत सदरहु दावा गुणदोषावर चालण्याच्या दृष्टीने प्रतिवादी यांना कैफियत दाखल करणेस जरी उशीर झालेला असला तरी भविष्यातील दावे प्रतिदावे टाळण्याच्या दृष्टीने प्रतिवादी यांच्याविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करून त्यांची कैफियत कोर्टात दाखल करण्यास मुभा देणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करुन त्यांच्याविरुध्द झालेला 'विना कैफियत आदेश रद्द करुन त्यांची

कैफियत रेकॉर्डवर घेणे क्रमप्राप्त ठरते. सबब खालील प्रमाणे आदेश करणेत येत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी यांचा नि.३० चा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी यांनी दाखल केलेली कैफियत केस कामी दाखल करुन घेण्यात यावी.

३. अर्जाचे स्वरुप पाहता खर्चाबद्दल आदेश नाही.

४. उभय पक्षकारांनी हुकुमाची नोंद घ्यावी.

Abhay Ashok Mehendale
Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2022.01.28 15:22:21 +0530

**सांगली.** **(अ. अ. मेहेंदळे)**

**दिनांक–२८.०१.२०२२** **चौथे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सांगली.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | चौथे सह दिवाणी न्यायालय व.स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | २८/०१/२०२२ |
| पी.डी.एफ./ अपलोड चा दिनांक | - | २८/०१/२०२२ |